RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ४०(२)] मंगळवार, जून २, २०२६/ज्येष्ठ १२, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांजकडून**

**घोषणा**

**दिवा- वसई सेक्शन टिवरी रोड येथे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकामाकरिता भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन/दिवा-वसई सेक्शन LC-१०-उड्डाणपुल/कलम-१९/कावि-७७/२०२६.— ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून दिनांक ३०/०३/२०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, वसई तालुक्याचे सक्षम प्राधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतूदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाखालील, जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी वसई तालुक्याकरिता उपविभागीय अधिकारी वसई यांस पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची -एक

## जमिनीचे वर्णन

### (अ) गाव टिवरी, ता. वसई, जि. पालघर

भुसंपादन प्रकरण ०१/२०२६

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादीत क्षेत्र (हे.आर.मध्ये) |
|---|---|---|
| १. | ४७/१ | ०.०३.८९ |
| २. | ४७/२ | ०.०१.६७ |
| ३. | ४८/४ | ०.०४.०८ |
| ४. | ४८/५ | ०.०४.१९ |
| ५. | ४८/७ | ०.०७.४६ |
| ६. | ५०/२ | ०.०२.५७ |
| ७. | ५०/३ | ०.०५.८४ |
| ८. | ५०/४ | ०.०४.४७ |
| ९. | ५०/५ | ०.०३.२२ |
| १०. | ७१ | ०.०७.२१ |
| ११. | ७२ | ०.००.७० |
| **एकूण** | | **०.४५.३०** |

## अनुसूची - दोन

| सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण | |
|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | **दिवा– वसई सेक्शन टिवरी रोड रेल्वे उड्डाण पुल बांधकाम प्रकल्प** |
| **प्रकल्पाचे वर्णन** | **दिवा– वसई सेक्शन टिवरी रोड रेल्वे उड्डाण पुल बांधकाम प्रकल्प**<br>पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील रेल्वे विभाग व महाराष्ट्र शासन यांनी ५०:५० प्रमाणात खर्च करून रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम सार्वजनिक विभाग बांधकाम विभाग पालघर यांचेकडून करण्यात येत आहे. वसई तालुक्यातील मौजे टिवरी येथे रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरु आहे. पालघर जिल्ह्यात वसई या तालुक्यात मौजे टिवरी येथे रेल्वे उड्डाणपुलाच्या प्रकल्पासाठी एकूण ०.४५.३० हे.आर. जमिनीची आवश्यकता असून संपादन संस्थेकडून संपादित क्षेत्र ०.४५.३० हे. आर. संपादन करणे बाकी आहे. |
| **समाजाला मिळणारे लाभ** | पालघर जिल्ह्यामधील वसई तालुक्यातील रेल्वे उड्डाणपुलामुळे रेल्वे क्रॉसिंगच्या वेळेस होणारी वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे. स्वतंत्र रेल्वे उड्डाणपुलामुळे वारंवार बंद होणाऱ्या रेल्वे फाटकाची समस्या सुटणार आहे.<br>स्थानिक लोकांच्या रहदारीची समस्या सुटेल तसेच शहराच्या पूर्व आणि पश्चिम बाजुस जाणेकामीचा प्रवास जलद व सुखकर होईल.<br>तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुकीत वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वकष विकास, पर्यावरण स्थिरता ह्या बाबी अभिप्रेत आहेत. |

**अनुसूची - तीन**

**बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.**

**(१) प्रकल्पाचे बांधकाम**

**(२) प्रकल्पाचे परिचालक**

**(३) प्रकल्पाच्या देखभालीखाली**

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता.

**अनुसूची - चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी त्यांचे अधिसूचना क्र. एसआयए-२०२२/प्र.क्र.११८/अ-२, दिनांक ३०.०१.२०२३ द्वारे भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) या मध्ये कलम १० क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण क्रमांक ३०, दिनांक ३०/०१/२०२३ नुसार जनहिताच्या दृष्टीने लोकहितकारी प्रकल्प असल्याकारणे प्रकरण दोन आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची - पाच**

| | | |
|---|---|---|
| अ | **प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम** | सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वसई |
| ब | **प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता** | श्रीप्रस्थ, नालासोपारा-विरार लिंक रोड, निळेमोरे, नालासोपारा (प.), ता.वसई, जि. पालघर, पिन.नं. ४०१ २०३. |
| क | **ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील** | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार भूसंपादन प्रस्तावानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये भुमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत जमिनीचे संपादन करणेबाबत आवश्यक ती कार्यवाहीकामी मा. जिल्हाधिकारी पालघर (भूसंपादन शाखा) यांचेकडील जा. क्र.भूसंपादन/कक्ष-१/टे-१/कावि-९९५/२०२३, दि. २४/०९/२०२४ रोजी अन्वये उपविभागीय अधिकारी वसई यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. |

**शेखर घाडगे,**
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी वसई.

**डॉ. श्रीकृष्ण पांचाळ,**
प्रभारी जिल्हाधिकारी ठाणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.